MHGO070002842023

## निशाणी क्र. ५ वरील आदेश

१. अर्जदार यांनी गैरअर्जदारांकडून या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम मासिक पोटगी व स्त्रीधन मिळावी व त्याकरीता कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ च्या कलम २३ अंतर्गत हा अर्ज दाखल केला आहे.

**अर्जाची हकीकत थोडक्यात पुढीलप्रमाणेः–**

२. अर्जदार हिने स्वतःसाठी महिलांचे संरक्षण कायदा २००५ च्या कलम १२ अंतर्गत हे प्रकरण दाखल केले आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा प्रेम विवाह सन २००७ मध्ये गोंदिया येथे रिवाजाप्रमाणे संपन्न झाले. विवाह संबंधातुन अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक १ यांना दोन मुली नामे अवनी व शाल्वी आहेत.

३. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, विवाहानंतर अर्जदार ही गैरअर्जदाराच्या घरी नांदायला गेली. अर्जदाराने गैरअर्जदार क्रमांक १ सोबत प्रेम विवाह केल्यामुळे गैरअर्जदार क्रमाक १ ची आई अर्जदार हिचा राग करीत होती. गैरअर्जदार कमांक १ हा लग्नानंतर एमएसईबीचे ठेके घेण्याचे काम करीत होता. गैरअर्जदार क्रमांक १ ने अर्जदार हिला लग्नानंतर आठ वर्षे चांगली वागणूक दिली. त्यानंतर अर्जदार ही दुस–यांदा गरोदर असतांना गैरअर्जदार क्रमांक १ हा अर्जदार हिच्यासोबत गैरवर्तणूक करु लागला.

४. सन २०१४ मध्ये गैरअर्जदार क्रमांक १ नेहमी त्याच्या कार्यालयातील मुलीसोबत फोनवर बोलत होता. अर्जदार हिला गैरअर्जदार क्रमांक १ च्या विवाहबाहय संबंधाबाबत माहिती झाली. त्यामुळे तिने त्याबाबत गैरअर्जदार क्रमांक १ च्या आईला सांगितले असता तिने अर्जदार हिला घरातून हाकलून देण्याची धमकी दिली. तेव्हापासुन गैरअर्जदार क्रमांक १ हा त्याच्या कार्यालयातील मुलीसोबत भाडयाच्या खोलीमध्ये एक वर्षापर्यंत राहिला. त्यावेळी तो आठवडयातून एखादया वेळी घरी येत होता. सन २०१५ मध्ये गैरअर्जदार क्रमांक १ परत घरी राहायला आला. त्यावेळी अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक १ एकाच घरात वेगवेगळया खोलीत राहात होते. गैरअर्जदार क्रमांक १ याने अर्जदार हिच्याशी बोलणे बंद केले व तिचे पालनपोषण करण्यास नकार दिला. त्याबाबत अर्जदार हिने गैरअर्जदार क्रमांक २ ला सांगितले असता तिने म्हटले की, तू आमच्या परिवाराची सगळीकडे बदनामी केली, तू बिलकूल आमच्यासोबत बोलायचे नाही. तिने गैरअर्जदार क्रमांक १ ला म्हटले की, जर तू हिच्यासोबत बोलतांना दिसला तर मी आत्महत्त्या करीन.

५. गैरअर्जदार कमांक १ ने अर्जदार हिचे पालनपोषण करण्यास नकार दिल्यामुळे अर्जदार हिने सन २०१५ मध्ये नारायणा शाळेमध्ये खाजगी नोकरी केली. त्यावेळी घरातील कामे व नोकरी सांभाळतांना अर्जदार हिने गैरअर्जदार क्रमांक १ यांना म्हटले की, इतके लोक घरी आहेत तर कामवाली लावा. त्यावेळी गैरअर्जदार क्रमांक १ ने म्हटले की, तू घरी असल्यानंतर कामवाली कशाला पाहिजे. सन २०१९ मध्ये गैरअर्जदार क्रमांक १ चा अपघात झाला त्यावेळी अर्जदार हिने गैरअर्जदार क्रमांक १ ची संपूर्ण काळजी घेतली. त्यावेळी अर्जदार हिची बहिण शिल्पा मेश्राम गैरअर्जदार क्रमांक १ ला पाहण्यासाठी आली होती त्यावेळी गैरअर्जदार क्रमांक १ ने अर्जदार हिच्याशी भांडण करुन तू माझ्या बापाच्या घरी राहते तर आम्ही जसे म्हणतो तसे राहा, तू आपल्या बापाच्या घरुन काय

आणली, रिकामटेकडी आली, किती पैसे आणले, आधी बापाच्या घरुन पैसे आण, मग इथे रहा, असे म्हटले.

६. अर्जदार ही नोकरी करीत असतांना गैरअर्जदार क्रमांक १ हा तिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिचे विवाहबाहय संबंध आहेत, असे म्हणून तिच्याशी नेहमी भांडण करीत होता. त्यामुळे सन २०२१ मध्ये अर्जदार हिने नोकरी सोडली. सन २०२२ च्या होळी सणाला गैरअर्जदार क्रमांक १ दारु पिवून आला व त्याने अर्जदार हिला बेदम मारहाण केली. त्यामुळे अर्जदार हिने पोलीस स्टेशनला तक्रार दिली. त्यावेळी गैरअर्जदार क्रमांक १ ने पोलीसांसमोर माफी मागून अर्जदार हिला रुपये पाच हजार प्रती महिना देण्याचे कबूल केले. परंतु पोलीस स्टेशनमधून आल्यानंतर गैरअर्जदार कमांक १ ने अर्जदारासोबत बोलणे बंद केले व पैसे देखील दिले नाही.

७. दिनांक १८/११/२०२२ रोजी अर्जदार हिने गैरअर्जदार क्रमांक १ कडे पैशाची मागणी केली असता त्याने पैसे देण्यास नकार दिला व तू कामवाली आहेस, फक्त माझ्या मुलांची आई, माझी बायको नाही, घरातले काम करायचे आणि मी जसे म्हणतो तसे राहायचे, असे म्हणाला. त्यामुळे त्यांच्यामध्ये वाद झाला. गैरअर्जदार क्रमांक १ ने अर्जदार हिला मारहाण केली व गैरअर्जदार क्रमांक २ ने आतून घराला कुलूप लावले व तू माझ्या घरात पाहिजे नाही, असे म्हटले. त्यामुळे अर्जदार हिने सिटी पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली. दिनांक १८/११/२०२२ पासुन अर्जदार ही तिच्या भावाच्या घरी राहात आहे. दिनांक १६/३/२०२३ रोजी अर्जदार ही तिच्या मुलीसह गैरअर्जदारांकडे नांदायला गेली त्यावेळी गैरअर्जदारांनी तिला लाथाबुक्यांनी मारहाण केली व तू आमच्या घरी का आली, तू आता येथे आली तर तुला पाहून घेईन, अशी धमकी दिली. त्यामुळे अर्जदार हिने सिटी पोलीस स्टेशन येथे गैरअर्जदाराविरुध्द रीपोर्ट दिली.

८. गैरअर्जदार क्रमांक १ हा व्यापारी असून त्याच्या मालकीचे टुकटुक मसाला ईटरप्राईज, चस्का सावजी रेस्टरेंट ॲन्ड फॅमिली गार्डन असून तो एमएसईबीत ठेकेदार आहे. त्यामधून त्याला रुपये दोन लाख प्रती महिना मिळकत आहे. गैरअर्जदार कमांक २ हिला पेन्शन मिळते. त्यामुळे गैरअर्जदार कमांक १ वर अर्जदाराशिवाय कोणाचिही जबाबदारी नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्रमांक १ ने अर्जदारांना रुपये वीस हजार प्रती महिना घरभाडयापोटी दयावे तसेच रुपये सत्तर हजार प्रती महिना पोटगी दयावी, अशी प्रार्थना केली आहे.

९. गैरअर्जदारांना निशाणी क्रमांक ८ ते ११ अन्वये दिनांक २५/०९/२०२३ रोजी नोटीस तामील होवून देखील ते सदर प्रकरणात हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यां च्याविरुध्द सदर प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश दिनांक १/१२/२०२३ रोजी निशाणी क्रमांक १ खाली पारित करण्यात आला. अर्जदाराच्या वकीलांचा अंतरिम अर्ज नि.क्रं. ५ वरील युक्तीवाद ऐकला.

१०. उपरोक्त अर्जातील वादासंबंधात माझेसमोर पुढील प्रश्न उपस्थीत होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| १. | अर्जदार ही प्रथमदर्शनी सिध्द करते काय की, गैरअर्जदारांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला? | ... होय. |
| २. | अर्जदार हि या प्रकरणात अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | ...अंशतः होय. |
| ३. | अर्जदार ही घरभाडे मिळण्यास पात्र आहे काय? | ...अंशतः होय. |

४. आदेश काय? ...अंतिम आदेशानुसार.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ करीताः–**

**११.** अर्ज वाचला. अर्जदारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार क्रं. १ व गैरअर्जदार क्रं. १ यांच्या उपस्थित वाद हा चौकशी व पुराव्याअंती निकाली होणार आहे. अर्जदार क्रं. १ ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी असुन त्यांना अवनी व शाल्वी अशा दोन मुली आहेत.

**१२.** मी इथे स्पष्ट करु इच्छिते की, अर्जदार ही गैरअर्जदार क्रं. १ ची पत्नी असल्यामुळे जोपर्यंत ती त्याच्यापासुन विभक्त होत नाही, तोपर्यंत पत्नीच्या व मुलांच्या पालनपोषनाची जबाबदारी ही तिच्या पती व पिता या नात्याने गैरअर्जदार क्रं. १ चे आहे.

**१३.** अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये गैरअर्जदारांनी तिच्यावर शारिरीक व मानसिक हिंसाचार केल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदारांना नोटीस तामील होवून देखील ते सदर प्रकरणात हजर झाले नाही. अशापरीस्थीतीत अर्जदाराच्या कथनावर अविश्वास करण्याचे कोणतेही कारण दिसुन येत नाही. गैरअर्जदार हजर झाले नसल्यामुळे त्यांच्याविरूध्द विपरीत अनुमान काढून असे ग्राह्य धरने कायदेशीर आहे की, त्यांना त्यांच्या वतीने सदर प्रकरणात काहीच सांगायचे नसुन त्यांना अर्जदाराने केलेली सर्व कथने व तिची मागणी मान्य आहे. अर्जदाराने तीच्या अर्जाच्या समर्थनार्थ नि. क्रं. ३ खाली महिला सेल, गोंदिया येथील अर्जदाराचे बयान, अदखलपात्र गुन्हयाच्या दोन पावत्या अभिलेखावर दाखल केलेली आहे. यावरुन, प्रथमदर्शनी गैरअर्जदारांनी अर्जदार वर कौटुंबीक हिसांचार केल्याचे दिसून येते. अर्जदार व गैरअर्जदारांमधील वाद पुराव्याअंती निकाली काढण्यात येईल.

**१४.** गैरअर्जदार क्रमांक १ हा व्यापारी असून त्याच्या मालकीचे टुकटुक मसाला ईटरप्राईज, चस्का सावजी रेस्टरेंट ॲन्ड फॅमिली गार्डन असून तो एमएसईबीत ठेकेदार आहे. त्यामधून त्याला रुपये दोन लाख प्रती महिना मिळकत आहे, असे कथन केले आहे परंतू त्याबाबत कोणताही दस्त अभिलेखावर दाखल नाही.

**१५.** अर्जदार हिने अर्जासोबत मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे त्यानुसार तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही असे दिसून येते. यावरुन, गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराचा पती या नात्याने अर्जदाराच्या पालनपोषणाची नैतिक व कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ वर आहे. गैरअर्जदार क्रमांक १ याला प्रती दिवस रुपये ३००/- मिळकत असल्याचे ग्राहय धरुन अर्जदाराने दाखल केलेला तिचा अर्ज व त्यासोबत दाखल केलेल्या दस्तांवरुन गैरअर्जदार हिला रुपये ३,०००/- अंतरिम पोटगी देण्यास समर्थ आहे तसेच अर्जदाराला घरभाडयापोटी रुपये १,०००/- देण्यास समर्थ आहे, असा निष्कर्ष निघतो. वरील सर्व चर्चेवरुन मुददा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देते. मुददा क्र. २ व ३ चे उत्तर अंशत होकारार्थी देऊन ४ चे उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

**१.** अर्ज (नि. क्रं. ०५) अंशतः मंजुर करण्यात येतो.

**२.** गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार यांना दरमहा ३,०००/- रुपये (रुपये तीन हजार फक्त)अर्ज दाखल तारखेपासुन सदर प्रकरणाच्या पुढील आदेशापर्यंत अंतरिम पोटगी द्यावे.

**३.** गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार यांना दरमहा १,०००/- रुपये (रुपये एक हजार फक्त)अर्ज दाखल तारखेपासुन सदर प्रकरणाच्या पुढील आदेशापर्यंत घरभाडे द्यावे.

३. दोन्ही पक्षांना तसेच संरक्षण अधिकारी यांना सदर आदेशाची प्रत कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ च्या कलम २४ अन्वये विनामुल्य देण्यात यावी.

स्वाक्षरी

दि. १५/०३/२०२४

**(श्रीमती एस. व्ही. चरडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय, देवरी

## प्रमाणपत्र

मी अधिकथन करते की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | संजीवन वामन मळामे, |
| न्यायालयाचे नाव | : | श्रीमती. एस. व्ही. चरडे, न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, देवरी |
| आदेशाची तारीख | : | १५.०३.२०२४ |
| आदेशावर अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १५.०३.२०२४ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | १५.०३.२०२४ |